दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ५० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२१ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# प्रकल्पग्रस्तांच्या एकजुटीचा आणखी एक विजय; सर्वेक्षणाला स्थगिती

## २४ जूनच्या आंदोलनाची जोरदार तयारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामासाठी जमीन संपादित करण्याच्या नोटिसा पारगाव, कुंडेवहाळ आणि ओवळे या गावांना सिडकोकडून देण्यात आल्या होत्या आणि त्या अनुषंगाने आज पारगाव येथे सर्वेक्षण करण्यात येणार होते. परंतु प्रकल्पग्रस्त आणि त्यांच्या लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती, २७ गाव समितीने प्रखर विरोध केल्याने सिडको आणि मेट्रो सेंटरने नमते घेत सर्वेक्षणाला येणे टाळले असून सद्यस्थितीत सर्वेक्षण व मोजणीला तात्पुरती स्थगिती दिली आहे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या एकजुटीचा आणखी एक विजय झाला आहे.**

सिडकोने प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न न सोडविता सर्वेक्षण व मोजणी करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे, त्या प्रयत्नांना आज पारगाव येथे हाणून पाडण्यात आले. यावेळी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष के. ए. म्हात्रे, राजेश गायकर, २७ गाव समितीचे प्रवक्ते रुपेश धुमाळ, प्रेम पाटील, प्रवीण पाटील, बाळाराम नाईक, संपर्क प्रमुख किरण पवार, नगरसेवक विजय चिपळेकर, कार्याध्यक्ष सुनिल म्हात्रे, सदस्य राकेश गायकवाड, माजी सरपंच महेंद्र पाटील, कवी तारेकर, प्रल्हाद नाईक, राहुल नाईक, सुशील तारेकर, माजी उपसरपंच निशा पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिडकोने पुन्हा पनवेल तालुक्यातील पारगाव, कुंडेवहाळ, ओवळे या गावांमधील जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाकरिता संपादित करण्यात येणार असल्याच्या नोटीसा प्रकल्पग्रस्तांना



दिल्या आहेत. विशेषतः प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न प्रलंबित असताना सिडको मात्र पुन्हा एकदा प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करीत आहे. सिडको विकसकांसाठी रेड कार्पेट तर प्रकल्पग्रस्तांकडे वारंवार दुर्लक्ष करत आहे. जमिनीचा सर्व्हे २० मे रोजी पारगाव व २३ तारखेला कुंडेवहाळ येथे होणार होता. विविध समस्यांबाबत ग्रामस्थ अनेक वर्षांपासून पाठपुरावा करीत आहेत तसेच विमानतळाच्या भरावामुळे गावे पाण्याखाली बुडत आहेत. त्याकडे सिडको जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. सिडकोने सर्वप्रथम या सर्व प्रलंबित समस्या सोडवाव्यात आणि त्यानंतरच भूसंपादनाचा विषय काढावा, अशी ठाम भूमिका घेण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी अधिकारी (भूसंपादन) यांनी एका नोटिसीद्वारे पार–गाव व परिसरातील गावातील काही प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीचे भूसंपादन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळा करिता व तद्दनुषंगिक विकास कामाकरिता संपादन करण्यासाठी मोजणी करण्याचे ठरवले होते. दिनांक १५ मार्च २०२२ रोजी सिडकोच्या मुंबई कार्यालयातील बैठकीमध्ये सर्व प्रश्नाबाबत एक स्वतंत्र बैठक लावण्याची मागणी केली होती व ती मान्य देखील केली होती. परंतु गेल्या दोन .../२

प्रकल्पग्रस्तांनी सिडकोकडे दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ व दिनांक ११ ऑक्टोबर २०२१ या दिवशी हरकतीचे मुद्दे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर १, पनवेल यांना सादर केलेले आहेत. परंतु आजच्या तारखेपर्यंत या बाबतीत कोणतेही स्पष्टीकरण अथवा खुलासा प्रकल्पग्रस्तांना मिळाला नाही. सदर जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला करिता व तद्द अनुषंगिक विकासकामा करिता संपादन होत असल्याचे मोघम स्वरूपात म्हटले आहे. त्या प्रकल्पग्रस्तांना विस्थापन व पुनर्वसनाचे कुठले लाभ देण्यात येतील व कधी देण्यात येतील. याबाबत काही निर्णय व धोरण ठरलेले नाही. तसेच कुठल्या कायद्याने भूसंपादन करणार किंवा सहमतीने भूसंपादन करणार का, याचीही माहिती प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेली नाही. त्यामुळे आज आयोजित केलेली संयुक्त मोजणी जोर जबरदस्तीने व एकतर्फी आहे. म्हणून त्याला सर्वपक्षीय समिती आणि प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला आहे. योग्य तो निर्णय घेण्यासाठी व प्रकल्पग्रस्तांनी उपस्थित केलेल्या हरकती व त्याचे पुनर्वसन याच्यावर चर्चा करण्यासाठी सिडको प्रशासनाचे सक्षम व संबंधित अधिकारी उपजिल्हाधिकारी भूसंपादन, समिती व प्रकल्पग्रस्तांसोबत बैठक बोलविण्यात यावी. सदर बैठकीपूर्वी अशा प्रकारची कुठल्याही संयुक्त मोजणी व सर्वेक्षणास कायम विरोध राहील, असे समिती आणि प्रकल्पग्रस्तांनी यावेळी अधोरेखित केले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव कोकण भवनात जल्लोषात साजरा

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ दलीतांचे नेते नसून ते समाजातील सर्व धर्मीयांचे नेते : डॉ. जितेंद्र आव्हाड



**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

लोकशाही मुल्यांच्या जपणूकीसाठी भारतीय संविधान अत्यंत महत्वाची भुमिका बजावत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ दलीतांचे नेते नसून ते पूर्ण समाजातील सर्व धर्मीयांचे नेते आहेत. कारण त्यांनी लिहीलेल्या संविधानामुळेच हा देश चालत आहे. त्यामुळेच सर्व धर्मीयांना योग्य पध्दतीने जगता येत आहे. असे मत महाराष्ट्र राज्याचे गृह निर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती कोकण भवन यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३१ वा जयंती महोत्सव नवी मुंबईतील कोकण भवन येथे जल्लोषात साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या जयंती महोत्सवाला कार्यक्रमाचे अध्यक्ष वस्तू व सेवा कर सह आयुक्त अपिले महाराष्ट्र राज्य रमेश जैद, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून विचारवंत आणि अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, एसीपी दत्ता तोडेवार, सार्वजनिक बांधकाम प्रा. विभाग (राष्ट्रीय महामार्ग) कोकण भवनचे मुख्य अभियंता संतोष शेलार, दक्षता व गुण नियंत्रण मंडळाचे अधिक्षक अभियंता सु. ल. टोपले, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगडचे अधिक्षक अभियंता आर. एम. गोसावी, समाज कल्याण मुंबई विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, महाराष्ट्र राज्य राजपत्रित महासंघ कोकण भवनचे अध्यक्ष तथा कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, संकल्प चित्र (सां.बा.) मंडळच्या कार्यकारी अभियंता हे. वा. कांबळे, सहसंचालक, कोकण विभागाचे नगररचनाकार राजेंद्र चौहान, महाराष्ट्र राज्य राजपत्रित महासंघ कोकण भवनचे सचिव तथा कोकण भवनचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ आदि मान्यवर उपस्थित होते.

जयंती महोत्सवाच्या प्रारंभी मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजश्री शाहू महाराज, महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापूरषांच्या प्रतिमेला पूष्पअर्पणकरुन अभिवादन केले.


यावेळी डॉ. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, सध्या देशात अस्थिर वातावरण आहे. परंतु उपलब्ध कायद्यांमुळे महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था उत्तम आहे. हे सर्व बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळेच .../२

# अवैध रेतीउपसा करणाऱ्यांवर पनवेल तहसीलची कारवाई, १० सक्शन पंप, एक बोट केली नष्ट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अवैध रेतीउपसा करणाऱ्यांवर पनवेल तह–सीलने कारवाई करत १० सक्शन पंप, एक बोट केली नष्ट केली आहे. या कारवाईमुळे अवैध रेतीउपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी कोपरा खाडीत कारवाई करीत १० सक्शन पंप आणि एक बोट पूर्णपणे नष्ट केली आहे.

पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांनी केलेली ही २८ वी कारवाई आहे. कोपरा खाडीत या कारवाईदरम्यान तहसीलदार विजय तळेकर हे महसूल विभागाच्या टीमसह घटनास्थळी हजर होते. भरतीच्यावेळी रेती उत्खनन करण्यासाठी आलेल्या सक्शन पंप आणि बोट महसूल पथकाला दिसताचक्षणी तहसीलदारांच्या आदे–शाने ही कारवाई करण्यात आली. गॅस कटरच्या साहाय्याने हे रबरी सक्शन पंप नष्ट करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार, ३ सर्कल अधिकारी आणि २ कोतवाल उपस्थित होते.



## संक्षिप्त...

### राज ठाकरेंचा अयोध्या दौरा स्थगित

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा अयोध्या दौरा स्थगित करण्यात आला आहे. राज ठाकरे ५ जून रोजी अयोध्येच्या दौऱ्यावर जाणार होते. परंतु प्रकृती अस्वस्थामुळे राज ठाकरेंचा दौरा काही काळासाठी स्थगित केला गेल्याची माहिती समोर आली आहे. राज ठाकरे यांच्या पायाला दुखापत झाली होती. पायाच्या दुखण्यानं पुन्हा एकदा डोकं वर काढल्यामुळे डॉक्टरांचा सल्लयानुसार त्यांनी अयोध्या दौरा स्थगित केल्याचं सांगितलं जात आहे. राज ठाकरेंनी त्यांच्या ट्विटर हँडलवर अयोध्या दौरा स्थगित केल्याची माहिती दिली आहे. यात त्यांनी अयोध्या दौरा स्थगित केला असून रविवारी पुण्यात होणाऱ्या सभेत याबाबत सविस्तर बोलू असं म्हटलं आहे.

राज ठाकरेंनी अयोध्या दौऱ्याची घोषणा केल्यानंतर मनसैनिकांनी जय्यत तयारीला सुरुवात केली होती. पण उत्तर प्रदेशातून राज यांच्या दौऱ्याला कडाडून विरोध करण्यात आला. भाजपाचे खासदार बृजभूषण चरण सिंह यांनी राज ठाकरेंनी आधी उत्तर भारतीयांची माफी मागावी त्यानंतरच अयोध्येला यावं अशी मागणी केली.

बृजभूषण सिंह यांनी याच पार्श्वभूमीवर मोठं शक्तीप्रदर्शन देखील केलं. तसंच ५ जून रोजी अयोध्येत राज ठाकरेंना येऊ देणार नाही. त्यासाठी ५ लाख लोक राज ठाकरेंना अडवतील असं म्हणत बृजभूषण सिंह यांनी शड्डू ठोकला आहे. त्यानंतर राज ठाकरे अयोध्या दौऱ्यावर ठाम होते.

# संजय राऊत राज्यसभेसाठी २६ मे रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राज्यात रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. एकीकडे संभाजीराजे छत्रपती अपक्ष म्हणून मैदानात उतरले आहे तर दुसरीकडे, शिवसेनेकडून संजय राऊत आता उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीची तारीख ठरली आहे. त्यामुळे आता शिवसेनेकडून महाराष्ट्रातून राज्यसभेवर सलग चौथ्यांदा जाण्याचा नवा विक्रम संजय राऊत प्रस्थापित करणार आहेत.



संजय राऊत येत्या २६ मे रोजी विधानभवनात जाऊन राज्य सभेसाठी शिवसेना उमेदवार म्हणून अर्ज दाखल करणार आहे. शिवसेना नेते म्हणून सलग चौथ्यांदा संजय राऊत राज्यसभेवर जाणार आहे. याआधी नजमा हेपतुल्ला महाराष्ट्रातून सलग ४ वेळा ( एकूण ६ टर्म ) राज्यसभेवर (१९८०–२०१८) निवडून गेल्या आहेत. तर, काँग्रेसकडून सरोज खापर्डे पाच वेळा राज्यसभेवर (७२–२०००) निवडून गेले आहेत. संजय राऊत यांनी राज्यातील महाविकास आघाडी सरकार स्थापन करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली होती.

दरम्यान, राज्यसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आणि सर्व पक्ष तयारीला लागले आ–हेत. राज्यातील बदललेल्या राजकीय स्थितीनुसार भाजपचे दोन, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेसचा प्रत्येकी एक उमेदवार विजयी होईल. तर, सहाव्या जागेसाठी आवश्यक असणारे संख्याबळ राज्यातील महाविकास आघाडी सरकारकडे आहे, त्यात शिवसेनेने आधीच सहाव्या जागेवर दावा केला आहे.

# मुंबई गोवा महामार्गावर स्कॉर्पिओची टेम्पोला जोरदार धडक

## स्कॉर्पिओ मधील एकाचा मृत्यू तर चार जण गंभीर जखमी



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई बाजूकडून महाड बाजूकडे जाणा–या स्कॉर्पिओ गाडीने महामार्गालगत उभ्या असलेल्या आयशर टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला. तर टेम्पो चालकासह स्कॉर्पिओ मधून प्रवास करणा–या तिघांसह चार जण गंभीररीत्या जखमी झाले आहेत. दैव बलवत्तर म्हणून स्कॉर्पिओ गाडी मधून प्रवास करणारे चार लहान मुले बालंबल बचावले आहेत. हा अपघात मुंबई गोवा महामार्गावर निडी गावाच्या हद्दीत निडी पुलाजवळ गुरूवारी (दि.१९) दुपारी २.३० वा. सुमारास घडला.

या अपघाता संदर्भात नागोठणे पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार मुंबई गोवा महामार्गावर नागोठण्याजवळील निडी गावाच्या हद्दीत निडी पुलाजवळ मुंबई बाजूकडून महाड बाजूकडे जाणा–या स्कॉर्पिओ चालक यग्नेश दिलीपभाई पटेल (वय ३३ वर्षे) रा. अहमदाबाद, गुजरात याचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला उभा असलेल्या व गणपतींच्या मुर्तींनी भरलेल्या टेम्पोला मागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. यामध्ये स्कॉर्पिओचा पुढील भाग चेपला जाऊन प्रवाशी गाडीमध्ये अडकले. यावेळी स्कॉर्पिओ चालकासह स्कॉर्पिओ मध्ये अडकलेले प्रवासी कार्तिक पंकजभाई पटेल (वय २८वर्षे), मानसी कार्तिक पटेल (वय २८वर्षे), फोरम यग्नेश पटेल ( वय ३४ वर्षे) सर्व .../२

# पनवेल येथे रेल्वे स्टेशन कन्सलटेटीव्ह कमिटीची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्टेशन कन्सलटेटीव्ह कमिटीची बैठक गुरुवार दिनांक २० मे रोजी पनवेल रेल्वे स्टेशन येथील स्टेशन प्रबंधक जे पी मीना यांच्या दालनात संपन्न झाली. प्रवासी संघ, पनवेल चे अध्यक्ष तथा कन्सलटेटीव्ह कमिटी सदस्य डॉ. भक्ती कुमार दवे आणि झोनल रेल्वे युजर्स कन्सलटेटीव्ह कमिटी चे सदस्य अभिजीत पाटील यांची या बैठकीला विशेष उपस्थिती होती.

रेल्वे प्रशासनाच्या वतीने स्टेशन मास्तर तथा स्टेशन कन्सलटेटीव्ह कमिटी चे सेक्रेटरी जे पी मीना, कमर्शियल स्टेशन मास्तर सुधीर कुमार उपस्थित होते. डॉ.भक्तीकुमार दवे यांनी प्रास्ताविक सादर केले.आगामी दोन वर्षाकरता गठीत झालेल्या या समितीची ही पहिलीच बैठक असल्याने जुन्या–नव्या सदस्यांनी एकोप्याने काम करत प्रवाशांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सहभागी झाले पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच रेल्वेच्या माध्यमातून कामे करवून घेत असताना येणारी आव्हाने, अडचणी समजावून घेणे गरजेचे आहे असे देखील ते म्हणाले.आगामी काळात येऊ घातलेल्या



DFC प्रकल्पामुळे आपल्याला आपल्या आंदोलनांची आणि मार्गक्रमणाची दिशा निश्चिती करणे देखील काळाची गरज बनली असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी स्थानक परिसरातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर आला. रेल्वे, सिडको आणि पनवेल महानगरपालिका ही तीनही .../२

# खोपोली शिळफाटा इंदिरा गांधी चौकातील मुख्य रस्त्यावर घाणीचे साम्राज्य

## स्वच्छ भारत अभियान कागदावर तर नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शिळफाटा इंदिरा गांधी चौकातील रिक्षा स्टॅन्ड सह मुख्यरस्त्यावर घाणीचे साम्राज्य पसरले असल्याचे दिसून येत आहे. शहरातील गेल्या अनेक दिवसापासून ठिक ठिकाणे गटारातून मेला, कचरा काढून रस्त्यावर तीन ते चार दिवस साठून ठेवेले जात आहे.तसेच शिळफा इंदिरा गांधी चौकातील रिक्षा स्टॅन्डवर येथे ये –जा करनाऱ्या नागरिकांना दुर्गंधी मुळे नाकाला रुमाल लावून जावे लागत आहे. देशात कोरोना सारख्या महाभयंकर आजाराने गेल्या दोन वर्षभर अक्षरशः थैमान घातले होते. नागरिकांच्या जनजीवनावर मोठे परिणाम झाला आहे .आता जशे तशे कुठे कोरोनावर मात करीत नागरिकांना दिलासा



मिळाला असून नगर परिषद पुन्हा मोठे रोगराई करीता शहरात घाणीचे ढीग साठवत आहे की काय? असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.

दर वर्षी खोपोली नगर परिषद .../२

# वृत्तपत्राची दखल घेवून कोलाड नाक्यावरील मुख्य रस्ता सुस्थितीत केला



**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

कोलाड नाक्यावरील मुख्य रहदारीच्या ठिकाणचा रस्ता उखडला अशा मथळ्यांची बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीची दखल घेवून सार्वजनिक बांधकाम खात्याने येथील रस्ता चकचकीत केला असून आता येथील रस्ता खड्डे विरहित झाला असून अनेक प्रवाशांनी आणि वाहन चालकानी वृत्तपत्राचे आभार मानले.

गेल्या वर्षी सतत पडणाऱ्या पावसामुळे येथील मुख्य रहदारीच्या ठिकाणचा रस्ता खड्डेमय झाला होता अनेक प्रवाशांना तसेच वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. वृत्तपत्रामध्ये या बाबत सविस्तर बातमी प्रसिद्ध होताच या बाबत उखडलेल्या रस्त्याची पावसाळ्यापूर्वी दखल घेवून रस्ता सुस्थितीत करण्यात आला आहे.

येथिल रस्ता मध्यवर्ती ठिकाणी असून रोहा, माणगाव नागोठणे कडे जाणारा असून या रस्त्याच्या कडेला आदिवासी भगिणी विविध प्रकारची फळे, भाजीपाला विक्रीसाठी घेवून बसतात तसेच रस्त्याच्या दुतर्फा लहान मोठी दुकानं आहेत. रस्ता उखडलेला होता तेव्हा सर्वांना धुळीचा मोठा त्रासही होत होता. त्याच प्रमाणे दुचाकी वाहन चालकांना मोठा त्रास होत होता आता रस्ता अत्यंत सुस्थितीत झाल्यामुळे अनेकांची त्रासापासून सुटका झाली आहे.

# हॅम रेडिओचा वापर आपत्ती काळात योग्यच : मीनल दळवी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आपत्ती काळात मोबाईल यंत्रणा बंद पडल्यास हॅम रेडिओचा वापर करून तातडीने आपत्ती व्यवस्थापन करता येऊ शकते. त्यासोबत आपण वित्तहानी, मनुष्यहानी, आग, अपघातही हॅम रेडिओचा वापर केल्याने टाळू शकतो, असे अलिबाग तहसिलदार मीनल दळवी म्हणाल्या.

अलिबाग तहसील कार्यालय येथे रायगडचा युवक फाउंडेशनतर्फे हॅम रेडिओच्या वापराबाबत आपत्ती व्यवस्थापन तज्ञ जयपाल पाटील यांनी प्रात्यशिक आयोजित केले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी नायब तहसिलदार तथा आपत्ती व्यवस्थापन प्रमुख अजित टोळकर, सोबत हॅम रेडिओ परवानाधारक रायगडचा युवक फाऊंडेशनचे खजिनदार सत्यम पाटील, आपत्ती व सुरक्षा मित्र मंगेश राऊत, प्रथमेश भगत हे अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरून तहसिलदार मीनल दळवी व आपत्ती व्यवस्थापन तज्ञ जयपाल पाटील यांच्यासोबत अलिबाग तहसील कार्यालय येथे संवाद साधत होते. तर आ-पत्ती व सुरक्षा मित्र तथा हॅम परवानाधारक दिलीप बापट हे हॅम रेडिओ कंट्रोल चेंढरे मधून देत होते. यावेळी मॉकड्रील करताना तहसिलदार मीनल दळवी यांनी वायरमन यांना आदेश देताच जिल्हा सामान्य रुग्णालयासमोरील रस्त्यावर पडलेल

# आंबा आणि तांदूळ महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

बचत गटांची उत्पादने शहरी भागात अधिकाधिक विक्री होण्यासाठी त्या उत्पादनांचा दर्जा, मांडणी आणि सजावटीसह पॅकेजिंगकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. असे मत

उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वर राऊत यांनी व्यक्त केले. नवी मुंबई नेरुळ येथील सेक्टर १८ या ठिकाणी असलेल्या विद्याभवन शाळेच्या आवारात उमेद अंतर्गत स्थापित महिला स्वयंसाह्ययता समुहांनी पिकवलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्याच्या उद्दे-शाने दि. २० ते २२ ते २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आंबा आणि तांदूळ महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कोकण विभागीय माहिती उपसंचालक, डॉ. गणेश मुळे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या उपसंचालक शीतल कदम, पुणे विद्यार्थी गृह, विद्याभवन शैक्षणिक संकुलाचे संचालक दिनेश मिसाळ, स्माईलस् फाउंडेशनचे कार्यवाहक धीरज आहुजा आणि अध्यक्ष श्रीमती उमा आहुजा तसेच स्माईलस् फाउंडेशनचे सदस्य शालिनी विधानी, शेफाली नायर, सुरजित सिंग आदि मान्यवर उपस्थित होते.

महोत्सवात सहभागी झालेल्या बचत गटांना मार्गदर्शन करताना श्री. परमेश्वर राऊत म्हणाले की, स्थानिक स्तरावरील बचत गटांनी आपल्या उत्पादनांचा दर्जा वाढविण्याकडे लक्ष द्यावे. आपण उत्पादित केलेल्या वस्तू ह्या शुध्द आणि नैसर्गिक व सेंद्रिय आहेत, परंतु त्यांची विक्री वाढविण्यासाठी त्यांचे सदरीकरण सुंदर आणि ग्राहकांना आकर्षित करणारे असावे. यासाठी बाहेरील बाजार पेठांचा, उत्पादकांचा त्यांच्या उत्पादनाचा अभ्यास करण्याची गरज आहे. एकदा खरेदी केलेली वस्तू ग्राहकाने पुन्हा खरेदी करावी करावी यासाठी ग्राहकांचे संपर्क क्रमांक नोंदवून घ्यावे, ग्राहकांना संपर्क करावा, त्यांना आपल्या उत्पादनाविषयीचा अभिप्राय विचारावा व त्यानुसार आपल्या उत्प-ादनात बदल आणि उत्पादनाचे प्रकार वाढवावेत असे सांगून श्री. राऊत यांनी सर्व बचतगटांना शुभेच्छा दिल्या.

# गडब येथे राज्यस्तरिय दिव्यांग (पॅरा) कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पेण**

ऑल स्पोर्टस असोसिएशन फॉर डिसेबल्ड आयोजित, अंपग कल्याणकारी संस्था रायगड, दिव्यांग क्रिडा असोसिएशन नवी मुंबई, कांळबादेवी युवक क्रीडा मंडळ गडब यांचे सहकार्याने रविवार दिनांक २२मे २०२२ रोजी सकाळी ११ वाजता राज्यस्तरिय दिव्यांग ( पॅरा ) कबड्डी स्पर्धेचे आयोजन गडब तालुका- पेण, जिल्हा- रायगड येथे करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उदघाटन व पारितोषक वितरनासाठी रायगड जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती दिलिप भोईर, महाराष्ट्र राज्य अपंग कल्याणकारी संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार, माजी आमदार धैर्यक्षिल पाटील, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रसाद भोईर, रायगड जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, एचआर जॉन्सन कंपनीचे जनरल मॅनेजर अरविंद जोशी, सरपंच अर्पणा कोठेकर, माजी उपसरपंच नितिन पाटील, प्रकाश पाटील आदि मान्यवर उपस्थित राहाणार आहेत. या स्पर्धेत राज्यातील आठ संघ सहभागी होणार आहेत.

# महिलेवर बलाचा प्रयोग करून तिचा लैगिक छळवणूक केल्या प्रकरणी एका व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओला गाडीत बसलेल्या महिलेचा विनयभंग करून तिचे तोंड दाबून बल प्रयोग करून तिचा लैगिक छळवणुक केल्याने ओला चालका विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ वर्षीय महिला राहणार इंडिया बुल्स ग्रीन लॅवेंडर्स हौ. सोसायटी हिला ओला गडावरील चालकाने इंडिया बुल्स सोसायटी ते पनवेल एस टी स्टॅन्ड दरम्यान घेऊन जात असताना सदर ठिकाणी तिला घेऊन न जात हायवेवर एका ठीकाणी गाडी थांबवून मागील सीट वर येऊन गाडीत बसलेल्या महिलेचा विनयभंग करून तिचे तोंड दाबून बल प्रयोग करून तिचा लैगिक छळवणुक केली. या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून या बाबत ओला गाडी क्रमांक एम एच ०१ सी व्ही ८२६१ वरील चालक मिराज हुसेन सिद्दीकी ह्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## प्रकल्पग्रस्तांच्या एकजुटीचा आणखी एक विजय; सर्वेक्षणाला स्थगिती

महिन्यांमध्ये त्या विषयाबाबत सिडको प्रशासनातर्फे एकही बैठक आयोजित करण्यात आली नाही. विशेष म्हणजे याकामी ग्रामस्थांशी बैठक तसेच चर्चा न करता हुकूम लादण्याचा प्रयत्न केला त्या अनुषंगाने ग्रामस्थ व प्रकल्पग्रस्तांनी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीकडे आपला प्रश्न मांडला. त्यावेळी जो पर्यंत प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रश्न मार्गी लागत नाही तो पर्यंत सर्वेक्षणाला विरोध राहण्याची ठाम भूमिका मांडली. त्यानुसार आज पारगाव येथे लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती, स्थानिक समिती, प्रकल्पग्रस्त, ग्रामस्थ मोठ्या संख्येने पारगाव येथे एकत्रित जमले होते. मात्र सिडको आणि मेट्रो सेंटरचे अधिकारी या विरोधाला घाबरून सर्वेक्षणाला आले नाहीत. तसेच संबंधित प्रशासनाने सर्वेक्षण करत नसल्याचे सांगून नमते घेतले. जो पर्यंत प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रश्न मार्गी तो पर्यंत सिडकोने सर्वेक्षणाचा विचार करू नये, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

तसेच २४ जूनचे आंदोलन हे पुनश्च एकदा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी सरकारला इशारा देणारे असणार आहे. एक लाखाहून अधिक भूमिपुत्र एकजूट दाखवणार आहेत. नामकरण व भूमिपुत्रांच्या प्रलंबित मागण्यांबाबत आणि भावी पिढीच्या अस्मितेसाठी सर्वांनी एकसंघ होऊन पुढील महिन्यात २४ जूनच्या आंदोलनात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी उपस्थितांना केले.

## सर्व धर्मीयांचे नेते : डॉ. जितेंद्र आव्हाड

शक्य आहे. बाबासाहेबांचे विचार आजही सर्वत्र पोहचविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी व्याख्यानात डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकाच जाती धर्मासाठी कार्य केले नसून, त्यांनी सर्व धर्मातील लोकांचे कल्याण केले आहे. बाबासाहेबांनी सर्व जाती धर्मातील लोकांसाठी केलेले कार्य हे उल्लेखनीय आहे. बाबासाहेबांनी केलेल्या त्यागाची प्रत्येक भारतीयांनी जाणीव ठेवणे आवश्यक आहे. यावेळी डॉ. सबनीसांनी बाबासाहेबांचे ऐतिहासिक किस्से आणि घटणा सांगितल्या.

पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांनी तयार केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनदर्शनाचे चित्रमय प्रदर्शन या जयंती महोत्सवस्थळी लावण्यात आले होते. या महोत्सवासाठी आलेल्या आणि कोकण भवनात येणाऱ्या नागरिकांसाठी हे प्रदर्शन आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले. डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी कार्यक्रम स्थळी पोहचल्यावर प्रथमतः प्रदर्शनाची पाहणी केली. प्रदर्शनात लावण्यात आलेल्या बाबासाहेबांच्या दूर्मिळ दस्ताएवजांच्या चित्रमय पॅनल्सचे बारकाईने निरिक्षण केले.

सकाळी १०.०० ते दूपारी २.०० या वेळेत आचार्य श्री नानेश हॉस्पिटलच्या वतीने सर्वांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन तसेच ओंकार प्रस्तूत भिम वंदना भीमगितांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव कोकण भवन समितीच्या आजी-माजी तसेच विशेष कामगिरी करणाऱ्या सदस्यांना सन्मान चिन्हे देऊन गौरविण्यात आले. गरजू गरीब विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूंचे वाटपही समितीच्यावतीने यावेळी करण्यात आले.

हा जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी समितीचे उपाध्यक्ष नरेश वाघमारे, सचिव प्रविण डोंगरदिवे, सहसचिव अजित न्यायनिर्गुणे, काषाध्यक्ष मंगेश येलवे, सदस्य वनिता कांबळे, मनिषा पवार, अमित साठे, विनोद वैदू आदिंनी विशेष परिश्रम घेतले.

## मुंबई गोवा महामार्गावर स्कॉर्पिओची टेम्पोला जोरदार धडक

रा. अहमदाबाद, गुजरात यांना स्थानिकांनी गाडीतून बाहेर काढले. या अपघातात स्कॉर्पिओ मधील प्रवाशांना लहान - मोठ्या स्वरूपाच्या जखमा झाल्या. तसेच अपघाताच्या वेळी टेम्पो तपासणी करण्याकरिता खाली उतरलेला टेम्पो चालक राकेश लक्ष्मण पाटील रा. ईरवाडी, पेण हा गंभीररीत्या जखमी झाल्याने या सर्व जखमींना नागोठणे पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने प्रथमोपचारासाठी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. याठिकाणी सर्व जखमींवर उपचार करून या सर्व जखमींना पुढील उपचारासाठी पेण व पनवेल येथील रुग्णालयात पाठविण्यात आले.

तर या अपघातात स्कॉर्पिओ मधील जित यग्नेश पटेल (वय ०१ वर्ष), धेय यग्नेश पटेल (वय ०४ वर्ष), शिवाय कार्तिक पटेल (वय ५ वर्ष) व न्यासा कार्तिक पटेल (वय ४ वर्ष) हे या अपघातात किरकोळ जखमी झाले असून त्यांनाही पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान स्कॉर्पिओ मधील जखमी प्रवासी कार्तिक पंकजभाई पटेल यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असल्याचे नागोठणे पोलिसांनी सांगितले. या अपघाताची नोंद नागोठणे पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पोलिस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## पनवेल येथे रेल्वे स्टेशन कन्सलटेटीव्ह कमिटीची बैठक संपन्न

आस्थापने रस्त्याच्या डागडुजी करता हात वर करत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अभिजित पाटील यांनी या विषयाबाबत अभ्यासपूर्ण माहिती मिळवून जर आस्थापने जबाबदारी स्वीकारत नसतील तर संयुक्तपणे भूमि परिक्षण करून त्या त्या आस्थापनांना अधिकार असलेल्या जागा निश्चिती करावीच लागेल अशी आग्रही भूमिका मांडली.

शौचालयातील अस्वच्छता, रिक्षांची होणारी गर्दी, वाहतुकीचा उडणारा बोजवारा, दुचाकी तसेच चारचाकी वाहनांच्या पार्किंगचा प्रश्न, कोरोना कालखंडात वाढविलेले विशेष प्रवासी शुल्क अद्यापही घेतले जात आहे ते पूर्ववत करणे, कंत्रादारांकडून प्रवाशांना होणारा त्रास,सबवे पनवेलच्या पूर्व स्थानक दिशेला उघडण्याचे काम जलद गतीने पूर्ण करणे, चिखले गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची रेल्वे पुलामुळे झालेली दुरावस्था दूर करणे, सोमाटणे रेल्वे स्थानकावर जाण्यासाठी रस्त्याची तरतूद करणे अशा विविध समस्यांबाबत रेल्वे प्रशासनाला अवगत करण्यात आले.

बैठकीनंतर कन्सलटेटीव्ह कमिटी सदस्यांनी कमर्शियल स्टेशन मास्तर सुधीर कुमार यांच्याबरोबर संपूर्ण स्टेशन परिसरात फिरून प्रवाशांसाठी च्या सोयीसुविधा, यापूर्वी मांडलेल्या समस्यांचे निराकरण यांचा आढावा घेतला. या बैठकीसाठी प्रवासी संघ पनवेल चे अध्यक्ष तथा कन्सलटेटीव्ह कमिटी सदस्य डॉ. भक्ती कुमार दवे आणि झोनल रेल्वे युजर्स कन्सलटेटीव्ह कमिटी चे सदस्य अभिजीत पाटील,स्टेशन मास्तर तथा स्टेशन कन्सलटेटीव्ह कमिटी चे सेक्रेटरी जे पी मीना, कमर्शियल स्टेशन मास्तर सुधीर कुमार, प्रवासी संघाचे कार्यवाह आणि सबर्बन रेल्वे युजर्स कन्सलटेटीव्ह कमिटी सदस्य श्रीकांत बापट, उपाध्यक्ष यशवंत ठाकरे, सहकार्यवाह निलेश जोशी, पत्रकार मंदार मधुकर दोंदे, विलास दातार, मधुकर आपटे, रमेश जानोरकर, संतोष पाटील,सुनील रानडे, सरिता पाटणकर,माजी स्टेशन मास्तर डी के गुप्ता,गौतम अगरवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

## खोपोली शिळफाटा इंदिरा गांधी चौकातील मुख्य रस्त्यावर घाणीचे साम्राज्य

स्वच्छ भारत अभियानावर कोटयावढी रुपये खर्च करते तरी देखील शहरात जागो जागी घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे. स्वच्छ भारत अभियान शहरातील फक्त बॅनरवर ,भिंतीवर रंग रंगोटी करून दाखविण्या साठी आहे का? स्वच्छ खोपोली सुंदर खोपोलीचा नारा लावणाऱ्या नगरपरिषद मध्ये नक्कीच स्वच्छता वर लक्ष देणारा आहे तरी कोण? पुरस्कार मिळाल्यानंतर शहरातील स्वच्छता ची गरजच नाही का? मोठी रोगराई पसरून नागरिकांचे बळी गेल्यावर सुंदर खोपोली स्वच्छ खोपोली होणार का? खोपोली शहरातील स्वच्छता सह अतिक्रमण तसेच अनेक विविध समस्यांवर खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व उपमुख्य अधिकारी शहराची पाहणी करणार का?असा सावल खोपोलीकरानं मधून व्यक्त होत आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाही नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतसमोर लिहिलेल्या मालक **१) श्री.अनिल जनार्दन केणी** हे त्यांचा सख्खा भाऊ आमचे अशिल नामे **श्री.सुधीर जनार्दन केणी** यांना बक्षिसपत्राने देणार आहेत. सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड बक्षिसपत्र करणार आहेत. सदर शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालकाचे नाव | संचिका क्र. | स्थळ | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री.अनिल जनार्दन केणी<br>२) श्रीमती.मोहिनी राजेंद्र केणी<br>३) श्री.प्रसाद राजेंद्र केणी | CHMO-ICIG-225 | वडघर (पुष्पक नोड) | आर १ | २१ | १२० चौ.मी. (पैकी त्यांचा अविभाज्य हिस्सा) |

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर बक्षिसपत्र पूर्ण करतील व सदरचे बक्षिसपत्र रजिस्टर्ड करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २०/०४/२०२२

**सही/-**
**कु.दिपाली रामदास गावंड**
**(ॲडव्होकेट हायकोर्ट)**
**शॉप नं.९, ए विंग, रचना रेसिडेन्सी, टिळक रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस असे सुचित करण्यात येत आहे की, १) श्रीमती.यमुना कृष्णा तारेकर, २) श्री.राजेंद्र उर्फ राजेश कृष्णा तारेकर, १ व २ रा.पारगांव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, ३) सौ.कमल अशिष राणा उर्फ कमल कृष्णा तारेकर, रा.जी ६, गोपाळ भुवन, चाळ नं.३, एल.बी.एस.मार्ग, घाटकोपर (प.) मुंबई, ४) सौ.सुशिला गणेश ठाकूर उर्फ सुशिला कृष्णा तारेकर रा.बोरखार, धुतूम, ता.उरण, जि.रायगड, ५) सौ.माधुरी महेश शिवकर उर्फ माधुरी मदन तारेकर, रा.केळवणे, ता.पनवेल, जि.रायगड ६) महादेव शंकर तारेकर, ७) नामदेव शंकर तारेकर, ६ व ७ रा.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड (मुळ मालक) यांच्या नावे सिडको मार्फत २२.५ टक्के योजनेंतर्गत संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात खालील भूखंडाचे वाटप केले आहे. माझे अशिल हे मुळ मालकाकडून सदरहू भूखंड हा मे.ड्रिम वर्ल्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री.अखिलेश रामरक्षा सिंह, २) श्री.महेश ज्ञानचंद्र पोपळे यांनी भूखंड विकसित कराराने ५०-५० टक्के तत्वावर विकसनाकरिता घेतलेला आहे. सदरहू संपादीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पुष्पकनगर नाड (दापोली), ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | सिडको फाईल नं. | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| पुष्पकनगर | | ०३ | ६४ | १०६० |

तरी वर नमूद संपादीत मिळकत / भूखंडाचे मालक यांचे व्यतिरिक्त जर कोणाही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर मिळकतीबाबत / भूखंडाबाबत विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्ठ्यार्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत सादर करावी. आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदर संपादीत मिळकत / भूखंड सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनातून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल. आणि कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता सदर संपादीत मिळकतीचा / भूखंड विकसित करण्याच्या दृष्टीने दिलेली मुदत संपल्यानंतर कार्यवाही करेल.

**सही/-**
**मिलन जयभिम जंगलबाग**
**(वकील हायकोर्ट)**
**यश कॉम्प्लेक्स सोसायटी, से.८, शॉप नं.१८, कळंबोली, नवी मुंबई**
**मो.नं.७३०४३२१७८७**

महाराष्ट्र शासन

### महाराष्ट्र शासन
### जलसंपदा विभाग
### कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, जि.रायगड
### तृतीय फेर ई-निविदा सूचना क्रमांक ९ सन २०२२-२३

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | वारळ खारभूमी योजना, ता.म्हसळा, जि.रायगड सा.क्र.४२५० मी. ते ४३२० मी. बांधाची पुनर्स्थापना व सा.क्र.५९४० मी. वरील उघाडीचे मजबूतीकरण | १८,७३,९२८/- |

निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २०/०५/२०२२ ते २६/०५/२०२२ पर्यंत
ई-निविदा उघडणे : दिनांक ३०/०५/२०२२

सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास खालील वेबसाईटवर कळविण्यात येईल.
http://mahatenders.gov.in

सदर कामांसाठी शासन शुद्धीपत्रक क्र.३ निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१/मंत्रालय, दि.०८, एप्रिल २०२१ अन्वये Geo Tagging कंत्राटदाराने करणे अनिवार्य आहे. कंत्राटदाराने Geo Tagging हे कार्यक्षेत्रावर भेटीच्या ठिकाणी Drop Box मध्ये टाकणे व लिफाफा क्र.१ मधून सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा सदर कंत्राटदाराची निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. Geo Tagging चा कालावधी दिनांक २०/०५/२०२२ ते २१/०५/२०२२ व २३/०५/२०२२ ते २५/०५/२०२२ पर्यंत राहील.

क्र.जिमाका/राअ/जाहि/३५/२०२२-२३

**सही/-**
**(सु.ह.सावंत)**
**कार्यकारी अभियंता**
**खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग,**
**पेण-रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## उरण मध्ये उन्हाळी शिबीरद्वारे मुलांनी दिले महत्वाचे संदेश

**दै.रायगड नगरी । उरण**

दिनांक २० मे २०२२ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड अंतर्गत उरण येथे दिनांक १२ मे ते २१ मे २०२२ दरम्यान चालू असलेल्या फुटबॉल खेळाचे उन्हाळी प्रशिक्षण शिबीरा मध्ये दिनांक २०/५/२०२२ रोजी द्रोणागिरी डोंगरावर ट्रेकिंगचा कार्यक्रम घेण्यात आला असून त्याच्यात भाग घेतलेल्या सर्व पालक व विद्यार्थ्यांनी सर्वांना पोस्टर द्वारे विश्व हिताचे महत्वपूर्ण संदेश दिले आहे.

प्रत्येकाने रोजचा दिनचर्या मध्ये प्लास्टिक चा वापर टाळणे हे खूप गरजेचे आहे. प्राणी व विश्व पर्यावरण हिताचे आहे. असा संदेश दिला.रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक व सचिन निकम यांच्या मार्गदर्शना खाली क्रीडा शिक्षक व सेव्हेन स्टार फुटबॉल अकॅडेमी उरणचे फुटबॉल प्रशिक्षक प्रवीण तोगरे, नंदिनी प्रवीण तोगरे व समस्त विद्यार्थी व पालकांनी मिळून हा उपक्रम द्रोणागिरी डोंगरावर सकाळी साफ सफाई करून सफलता पूर्वक राबविला.पर्यावरण विषयक जनजागृती करून एक चांगला संदेश सदर विद्यार्थ्यांनी समाजात पोहोचवीला आहे.

## नवीन पनवेल, ए टाईपमधील १०० चाळींच्या नळांची पाइपलाइन बदला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल सेक्टर १३ मधील ए टाईपमधील १०० चाळींची नळाची पाइपलाइन महापालिकेतर्फे बदलून देण्याची मागणी भाजप ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे.

पनवेल महापालिका हद्दीतील नवीन पनवेल प्रभाग १७ मधील सिडको वसाहतीत असलेल्या सेक्टर १२ ते २० मध्ये सिडकोने बांधलेल्या इमारतींना पाणीपुरवठा करणाऱ्या नळांची पाइपलाइन ४० वर्षे जुन्या असल्याने जीर्ण व आ-तून गंज पकडल्याने जाम झाल्या आहेत. सेक्टर १३मधील ए टाइप वसाहत ही सखल भागातील बैठ्या स्वरूपाची असल्याने पावसाळ्यात त्या भागात पाणी साचते. त्यामुळे पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइन दलदलीमुळे गंजून अनेक ठिकाणी फुटल्या आहेत. त्यामुळे या भागाला पाणी पुरवठा व्यवस्थित होत नसल्याने रहिवाश्यांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. यासाठी नवीन पनवेलच्या सेक्टर १३ मधील ए टाईपच्या १०० चाळींची नळांची पाइपलाइन पनवेल महापालिकेमार्फत बदलून देण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे पत्र देऊन केली आहे.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या शिक्षक आरोपीस आजन्म जन्मठेपेची शिक्षा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील गोरेगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत सन २०१६ ते दिनांक १७/०७/२०१९ चे दरम्यान रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा फलाणी ता. माणगांव येथील जुन्या इमारतीच्या खोलीत दोन अल्पवयिन मुलींवर अत्याचार व अनैसर्गिक अत्याचाराचे अमानुष कृत्य करणाऱ्या नित्यानंद धोंडू पाटील या नराधमास अखेर आजन्म मरेपर्यंत कारावासाची शिक्षा सूनावली आहे. मा. जिल्हा न्यायालयाचा हा ऐतिहासिक निर्णय असुन अशा प्रकारे अमानुष निचकृत्याला माफी नाही हेच सिध्द झाले आहे.

सदर घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, या गुन्ह्यातील फिर्यादी यांची पीडित मुलगी व तिची एक मैत्रिण या इयत्ता पहिली पासून रा.जि.प. मराठी शाळा फलाणी येथे शिक्षण घेत होत्या. व त्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्या इयत्ता दुसरी मध्ये शिकत असल्यापासून आरोपीत याने गैरफायदा घेऊन पिडित दोन मुलींवर जबरदस्तीने वारंवार लैंगिक अत्याचार व अनैसर्गिक अत्याचार करून सदर प्रकार कोणाला सांगितला तर मी तुम्हाला मारेन अशी पिडित मुलींना दमदाटी करून धमकी दिली.

वरील घटनेची फिर्याद गोरेगाव पोलिसांनी घेतली भा.द.वि.स.कलम ३७६ (२)(एफ)(आय)(एन), ३७६ (सी)(बी), ३७६(एबी), ३७७,५०६, व पोस्को कायदा कलम ४,६,८ तसेच अ.जा.ज.का.क.१(१) (डब्ल्यू)(ळ ) (ळळ), ३(२)(७) अन्वये गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा तपास शशीकिरण काशिद पोलीस उपअधिक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी माणगांव, विभाग माणगांव यांनी केला. व सदरचे दोषारोप पत्र मा.जिल्हा व सत्र न्यायालय माणगांव येथे दाखल केले.

सदर खटल्याची सुनावणी मा.अति.सत्र न्यायाधीश श्रीमती पी.पी. बनकर माणगांव रायगड यांचे कोर्टात झाली. सदर गुन्ह्यात पिडीत दोन मुलींची, एका पिडीत मुलीची आई फिर्यादीची व शाळेवर असणाऱ्या सह शिक्षिकेची तसेच वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष महत्त्वाची ठरली. सदर खटल्यामध्ये सहाय्यक सरकारी वकील जितेंद्र म्हात्रे यांनी सरकार पक्षाच्या वतीने काम पाहिले. व कोर्टासमोर प्रभावीपणे युक्तीवाद करून मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांचे महत्वाचे न्यायनिर्णय दाखल केले.

सदर केसच्या सुनावणी दरम्यान पैरवी अधिकारी उदय धुमास्कर, पोलीस उपनिरीक्षक, सौ. छाया कोपनर मपोह, शशिकांत कासार पोह, शशिकांत गोविलकर पोह, सुनील गोळे पोशि यांनी सहकार्य केले. सदर साक्षीदारांची साक्ष व न्यायनिर्णयाच्या आधारे मा.विशेष व सत्र न्यायाधीश श्रीमती पी.पी. बनकर माणगांव रायगड यांनी सदर घटनेतील गुन्ह्याच्या शाबीतीनंतर आरोपी यास दिनांक १९/५/२०२२ रोजी दोषी ठरवुन भा.द.वि.स. कलम ३७६, ३७७, व पोस्को कायदा कलम ४,६,८ नुसार कारावास आजन्म कारावास (मरेपर्यंत) सक्तमजुरीची व रुपये १,५०,००० /- (एक लाख पन्नास हजार रुपये) दंड, दंड न भरल्यास एक वर्ष साध्या कारावासाची शिक्षा सुनावली.

## कर्जत नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनची बैठक संपन्न



**दै.रायगड नगरी । कर्जत**

नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनची बैठक कर्जतचे प्रांतअधिकारी अजित नैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच संपन्न झाली, त्यामध्ये त्यांनी कर्जत तालुक्यातील माहिती बाबत आढावा घेऊन नैसर्गिक आपत्ती ओढवू नये याबाबत खबरदारीच्या मार्गदर्शक सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

प्रांत अधिकारी अजित नराळे यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, कर्जत नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे तसेच संबंधित कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रांत अधिकारी अजित नैराळे यांनी कर्जत तालुक्यात पावसाळ्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्ती विषयी मागील आपत्तींचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना पावसाळ्यापूर्वीच याबाबत खबरदारी घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या तसेच नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास यंत्रणा सज्ज ठेवा अश्या मार्गदर्शक सूचना या बैठकीत केल्या.

## हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विनयकुमार राजधारी यादव हे पारिक बल्क कॅरियर कंपनीमधील टँकरवर चालक म्हणून काम करतात. त्यांचे सुभेदार यादव यांच्यासोबत आठवड्यापुर्वी वाद झाला होता. त्यानंतर ते तोंडरा फाटा येथे जेवण करून त्यानंतर टँकर लावलेल्या कंपनीत जाण्यासाठी निघाले. मच्छी कंपनीच्या गेट समोर यादव आले असता मागील भांडणाचा राग मनात धरून सुभेदार यादव यांचा भाऊ मोतीलाल यादव, संदीप यादव व दोन अनोळखी इसमांनी त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉडने डोक्यात घाव घातला. तसेच डाव्या हातावर व दोन्ही पायांवर रॉडने मारहाण करून गंभीर दुखापत केली. विनय कुमार यांच्यावर एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचार सुरू आहेत.

## रिलायन्स स्कूलची कु. मानसी पवार हिचा राज्यपालांच्या हस्ते गौरव

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड मुंबई यांच्यावतीने देण्यात येणारा सन २०१८ - १९ व सन २०१९ - २० या दोन वर्षांचा राज्य पुरस्कार नागोठणे येथील रिलायन्स फाउंडेशन स्कुलच्या स्काऊट गाईड विभागाची विद्यार्थिनी तसेच आमडोशी(ता. रोहा) येथील सुप्रिम पेट्रोकेम लि. या कंपनीचे अधिकारी शिवाजी पवार यांची कन्या कु. मानसी पवार हिला महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते राज्य पुरस्कार प्रमाणपत्र देऊन नुकताच गौरवण्यात आला.

स्काऊट गाईड पॅव्हेलियन, शिवाजी पार्क, दादर पश्चिम, मुंबई येथे नुकताच पार पडलेल्या या सोहळ्यास क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड चे अध्यक्ष सुनील केदार, राज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री ना. कु. आदितीताई तटकरे, राज्याचे मुख्य आयुक्त तथा क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त ओम प्रकाश बकोरिया तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यातून राज्य पुरस्कार उत्तीर्ण झालेल्या स्काऊट गाईड पैकी प्रतिनिधी स्वरूपात प्रत्येक जिल्ह्यातून दोन स्काऊट गाईड उपस्थित होते.

चंद्रपूर जिल्ह्यातील ४३ स्काऊट व ५६ गाईड यांचे नेतृत्व सावली येथील रमाबाई आंबेडकर विद्यालयाचे स्काऊट दिशांत गुप्तराज ढेंगळे, जि. प. हायस्कूल चेकनिंबाळा येथील



सम्यक सत्यविजय वाघमारे, प्रियदर्शनी कन्या विद्यालय घुघुस, येथील येथील गाईड अश्लेषा बिभीषण फुसाटे तर भवानजीभाई चव्हाण हायस्कूल चंद्रपूर येथील हर्षा दत्तात्रेय रायपुरे तसेच स्काऊट गाईड यांचे नेतृत्व भवानजीभाई चव्हाण हायस्कूल चंद्रपूर च्या गाईड कॅप्टन तथा लीडर रंजना किन्नाके यांनी केले.

सर्व स्काऊट गाईड यांना राज्यपाल भगतसिंग कोशारी यांच्या हस्ते राज्य पुरस्कार प्रमाणपत्र वितरित करण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.


**प्रो.जमा रु.५०/-** **अर्जदारतर्फे वकील पी.व्ही.म्हात्रे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.ज्यु.डी.मॅजी वर्ग १ ला यांचे कोर्टात

**क्रि.चौ.अर्ज नं.५७७/२०२२**

श्री.संदीप अर्जुन भालेराव
वय : ३५ वर्षे, धंदा : शेती / नोकरी
रा.रुम नं.४०४, कृष्णा सॉलिटीयर, प्लॉट नं.२४,
सेक्टर २, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार श्री.संदीप अर्जुन भालेराव यांची मुलगी कु.याशिका संदीप भालेराव हिचा जन्म दि.२/०४/२०२१ रोजी अश्विनीकुमार हेल्थकेअर एलएलपी'एस-आधार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ॲण्ड आय.सी.यु.पनवेल येथे झालेला आहे. सदर जन्माची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेलेली आहे. कारण अअर्जदार यांच्या मुलीचा जन्म अश्विनीकुमार हेल्थकेअर एलएलपी'एस-आधार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ॲण्ड आय.सी.यु.पनवेल येथे झाला आहे. सबब अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद केलेली नाही. सबब अर्जदार यांची मुलगी कु.याशिका संदीप भालेराव हिचा जन्म दि.२/४/२०२१ रोजी झालेला आहे. जन्म मृत्यू नोंदणी कायदा अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे जन्माची उशिरा नोंद करून मिळणेबाबत संबंधित सक्षम अधिकारी पनवेल, शहर महानगरपालिका पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांना योग्य ते आदेश देणेबाबत नामदार कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सबब सदरचा जन्म नोंदीचा आदेश देण्यासंबंधी कोणाही कोणाच्याही कसल्याही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस त्यांच्या जन्माची नोंदीचा आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सहीशिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**



**प्रो.जमा रु.५०/-** **अर्जदारतर्फे वकील पी.व्ही.म्हात्रे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.ज्यु.डी.मॅजी वर्ग १ ला यांचे कोर्टात

**क्रि.चौ.अर्ज नं.५८४/२०२२**

श्रीमती.शोभा गणेश सोमण
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.२०२, २ रा मजला,
यशश्री सीएचएस, टिळक रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्यापेक्षा कै.गणेश शंकर सोमण हे दि.०६/०४/२०२० रोजी उपजिल्हा रुग्णालय पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले म्हणून अर्जदार श्रीमती.शोभा गणेश सोमण, रा.फ्लॅट नं.२०२, २ रा मजला, यशश्री सीएचएस, टिळक रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांनी या न्यायालयात सदरहू कै.गणेश शंकर सोमण यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.गणेश शंकर सोमण हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळववाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तींचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.१३/०५/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, १) श्री.केसरीनाथ भिवा पाटील, रा.नावडे, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, २) श्री.चंद्रकांत भिवा पाटील, रा.नावडे, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ३) कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस ३/१) श्री.दिनेश प्रभाकर पाटील, रा.नावडे, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ३/२) श्री.गणेश प्रभाकर पाटील, रा.नावडे, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ४) कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस ४/१) श्री.एकनाथ लक्ष्मण पाटील, ४/२) श्री.राजेंद्र लक्ष्मण पाटील, ४/३) कै.वासुदेव लक्ष्मण पाटील, ४/३/१) श्रीमती.नंदा वासुदेव पाटील, ४/३/२) श्री.प्रसाद वासुदेव पाटील सर्व रा.मु.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ४/३/३) सौ.प्रतिभा संदेश म्हात्रे रा.घर नं.१२८ (१४२), खारबाव रोड, कालवार भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे, ४/३/४) सौ.प्रतिक्षा सचिन वास्कर, रा घर नं.५९, कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड. ४/४) देवयानी दिनकर पाटील रा.हाजिमलंग वाडी, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, ४/५) सौ.कल्पना अनंत बसवंत रा.खुटघर, ता.शहापूर, जि.ठाणे, ४/६) श्रीमती. शोभा सुहास तांडेल, रा.करावे, ता.नवी मुंबई, जि.ठाणे, ४/७) श्रीमती.माणिक लक्ष्मण मोकल, रा.साई, ता.पनवेल, जि.रायगड, ४/८) कै.गुलाब भगवान पाटील मयत तर्फे वारस ४/८/१) श्री.प्रवीण भगवान पाटील, रा.रुम नं.२०५, संतोषी माता मंदिर मांगरुळ, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, ४/८/२) प्रतिभा पप्पू पाटील, रा.रुम नं.२०५, संतोषी माता मंदिर मांगरुळ, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, ४/८/३) सौ.सोनाली जगदीश पाटील, रा.नारीवली, पो.वाकलन, ता.जि. ठाणे, यांचे सामाईक मालकीच्या मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती शासनातर्फे सिडको नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेल्या आहेत.

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | १९२+९३ | १०६ | ८ | ०-४-१२ |
| | | १०७ | २ | ०-१०-० |

(सोयीकरिता वर वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीस यापुढे ''सदरहू संपादीत मिळकत'' असे संबोधण्यात आलेले आहे.)

श्री.केसरीनाथ भिवा पाटील, श्री.चंद्रकांत भिवा पाटील, कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस आणि कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस यांचे वरील संपादीत मिळकतींच्या मोबदल्यात शासनाच्या साडेबारा टक्के योजनेंतर्गत त्यांना त्यांचे सिडको फाईल नं.१०० अन्वये मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाचा भूखंड इरादीत करण्यात आलेले आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे | से. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| नावडे | ४५ | १०५ | १५० |

(सोयीकरिता वर वर्णन करण्यात आलेल्या भूखंडास यापुढे ''सदरहू भूखंड'' असे संबोधण्यात आलेले आहे.)

आमचे अशिलांनी सदरहू भूखंड श्री.केसरीनाथ भिवा पाटील, श्री.चंद्रकांत भिवा पाटील, कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस आणि कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू संपादीत मिळकत / सदरहू भूखंड किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाही व्यक्ती, संस्था किंवा कंपनी यांचा कोणाचाही साठेकार, विक्रीकरार, भाडेपट्टा, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, तारण, एम.ओ.यु., दावा, वादविवाद, कुळवहिवाट, चार्ज, ॲटॅचमेंट, वारसाहक्क व इतर कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास सदर व्यक्ती, संस्था अगर कंपनी वा त्यांचे हितसंबंधी यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी खालील सही करणार यांच्या कार्यालयात लेखी कळवावी. वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू संपादीत मिळकत / सदरहू भूखंड हे निर्वेध व बोजारहीत असून त्यामध्ये कोणाचाही हक्क-हितसंबंध नाही असे आमचे अशिल गृहीत धरुन सदरहू भूखंडाबाबतचा श्री.केसरीनाथ भिवा पाटील, श्री.चंद्रकांत भिवा पाटील, कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस आणि कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस यांचे सोबतचा भूखंड हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करून सदरहू भूखंड हे आपल्या नावे कायमस्वरुपी त्रिपक्षीय कराराद्वारे सिडको दप्तरी हस्तांतरीत करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.
दि.२१/०५/२०२२

**सही-**
**ॲड.छाया रामदास म्हात्रे**
**(बी.ए., एल.एल.बी.)**
**पायोनिअर सोसायटी, ग्राऊंड फ्लोअर,**
**स्वामी नित्यानंद रोड, युविका हॉटेल**
**समोर, ता.पनवेल, जि.रायगड**



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, १) कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस १/१) श्री.एकनाथ लक्ष्मण पाटील, १/२) श्री.राजेंद्र लक्ष्मण पाटील, १/३) कै.वासुदेव लक्ष्मण पाटील, १/३/१) श्रीमती.नंदा वासुदेव पाटील, १/३/२) श्री.प्रसाद वासुदेव पाटील सर्व रा.मु. नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, १/३/३) सौ.प्रतिभा संदेश म्हात्रे रा.घर नं.१२८ (१४२), खारबाव रोड, कालवार भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे, १/३/४) सौ.प्रतिक्षा सचिन वास्कर, रा घर नं.५९, कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड. १/४) देवयानी दिनकर पाटील रा.हाजिमलंग वाडी, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, १/५) सौ.कल्पना अनंत बसवंत रा.खुटघर, ता.शहापूर, जि.ठाणे, १/६) श्रीमती.शोभा सुहास तांडेल, रा.करावे, ता.नवी मुंबई, जि.ठाणे, १/७) श्रीमती.माणिक लक्ष्मण मोकल, रा.साई, ता.पनवेल, जि.रायगड, १/८) कै. गुलाब भगवान पाटील मयत तर्फे वारस १/८/१) श्री.प्रवीण भगवान पाटील, रा.रुम नं.२०५, संतोषी माता मंदिर मांगरुळ, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, १/८/२) प्रतिभा पप्पू पाटील, रा.रुम नं.२०५, संतोषी माता मंदिर मांगरुळ, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, १/८/३) सौ.सोनाली जगदीश पाटील, रा.नारिवली, पो.वाकलन, ता.जि.ठाणे, २) श्री.केसरीनाथ भिवा पाटील, रा.नावडे, पो. नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ३) श्री.चंद्रकांत भिवा पाटील, रा.नावडे, पो. नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ४) कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस ४/१) श्री.दिनेश प्रभाकर पाटील, रा.नावडे, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ४/२) श्री.गणेश प्रभाकर पाटील, रा.नावडे, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे सामाईक मालकीच्या मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती शासनातर्फे सिडको नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेल्या आहेत.

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | १७१ | ४९ | ३ अ | ०-३१-० |
| | | २७ | १ | १-०२-८ |
| | | २१८ अ | ३ | ०-०४-० |
| | | ७४ | १ | ०-२१-७ |
| | | २७ | २ | ०-२७-८ |

(सोयीकरिता वर वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीस यापुढे ''सदरहू संपादीत मिळकत'' असे संबोधण्यात आलेले आहे.)

श्री.केसरीनाथ भिवा पाटील, श्री.चंद्रकांत भिवा पाटील, कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस आणि कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस यांचे वरील संपादीत मिळकतींच्या मोबदल्यात शासनाच्या साडेबारा टक्के योजनेंतर्गत त्यांना त्यांचे सिडको फाईल नं.१०० अन्वये मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाचा भूखंड इरादीत करण्यात आलेले आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे | से. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| नावडे | ४५ | ४४ | ११०० चौ.मी. |

(सोयीकरिता वर वर्णन करण्यात आलेल्या भूखंडास यापुढे ''सदरहू भूखंड'' असे संबोधण्यात आलेले आहे.)

आमचे अशिलांनी सदरहू भूखंड श्री.केसरीनाथ भिवा पाटील, श्री.चंद्रकांत भिवा पाटील, कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस आणि कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू संपादीत मिळकत / सदरहू भूखंड किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाही व्यक्ती, संस्था किंवा कंपनी यांचा कोणाचाही साठेकार, विक्रीकरार, भाडेपट्टा, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, तारण, एम.ओ.यु., दावा, वादविवाद, कुळवहिवाट, चार्ज, ॲटॅचमेंट, वारसाहक्क व इतर कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास सदर व्यक्ती, संस्था अगर कंपनी वा त्यांचे हितसंबंधी यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी खालील सही करणार यांच्या कार्यालयात लेखी कळवावी. वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू संपादीत मिळकत / सदरहू भूखंड हे निर्वेध व बोजारहीत असून त्यामध्ये कोणाचाही हक्क-हितसंबंध नाही असे आमचे अशिल गृहीत धरुन सदरहू भूखंडाबाबतचा श्री.केसरीनाथ भिवा पाटील, श्री.चंद्रकांत भिवा पाटील, कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस आणि कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस यांचे सोबतचा भूखंड हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करून सदरहू भूखंड हे आपल्या नावे कायमस्वरुपी त्रिपक्षीय करारा‌द्वारे सिडको दप्तरी हस्तांतरीत करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.
दि.२१/०५/२०२२

**सही-**
**ॲड.छाया रामदास म्हात्रे**
**(बी.ए., एल.एल.बी.)**
**पायोनिअर सोसायटी, ग्राऊंड फ्लोअर,**
**स्वामी नित्यानंद रोड, युविका हॉटेल**
**समोर, ता.पनवेल, जि.रायगड**



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, १) कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस १/१) श्री.एकनाथ लक्ष्मण पाटील, १/२) श्री.राजेंद्र लक्ष्मण पाटील, १/३) कै.वासुदेव लक्ष्मण पाटील, १/३/१) श्रीमती.नंदा वासुदेव पाटील, १/३/२) श्री.प्रसाद वासुदेव पाटील सर्व रा.मु. नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, १/३/३) सौ.प्रतिभा संदेश म्हात्रे रा.घर नं.१२८ (१४२), खारबाव रोड, कालवार भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे, १/३/४) सौ.प्रतिक्षा सचिन वास्कर, रा घर नं.५९, कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड. १/४) देवयानी दिनकर पाटील रा.हाजिमलंग वाडी, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, १/५) सौ.कल्पना अनंत बसवंत रा.खुटघर, ता.शहापूर, जि.ठाणे, १/६) श्रीमती.शोभा सुहास तांडेल, रा.करावे, ता.नवी मुंबई, जि.ठाणे, १/७) श्रीमती.माणिक लक्ष्मण मोकल, रा.साई, ता.पनवेल, जि.रायगड, १/८) कै. गुलाब भगवान पाटील मयत तर्फे वारस १/८/१) श्री.प्रवीण भगवान पाटील, रा.रुम नं.२०५, संतोषी माता मंदिर मांगरुळ, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, १/८/२) प्रतिभा पप्पू पाटील, रा.रुम नं.२०५, संतोषी माता मंदिर मांगरुळ, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, १/८/३) सौ.सोनाली जगदीश पाटील, रा.नारिवली, पो.वाकलन, ता.जि.ठाणे, २) श्री.केसरीनाथ भिवा पाटील, रा.नावडे, पो. नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ३) श्री.चंद्रकांत भिवा पाटील, रा.नावडे, पो. नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ४) कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस ४/१) श्री.दिनेश प्रभाकर पाटील, रा.नावडे, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड, ४/२) श्री.गणेश प्रभाकर पाटील, रा.नावडे, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे सामाईक मालकीच्या मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती शासनातर्फे सिडको नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेल्या आहेत.

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | १७१ अ | १७१ | ३ | ०-११-८ |
| | | १३ | ४ | ०-०३-० |
| | | १८७ | ३ | १-२४-८ |
| | | १८३ | ० | २-२३-१२ |
| | | १७८ | ० | १-२३-० |

(सोयीकरिता वर वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीस यापुढे ''सदरहू संपादीत मिळकत'' असे संबोधण्यात आलेले आहे.)

श्री.केसरीनाथ भिवा पाटील, श्री.चंद्रकांत भिवा पाटील, कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस आणि कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस यांचे वरील संपादीत मिळकतींच्या मोबदल्यात शासनाच्या साडेबारा टक्के योजनेंतर्गत त्यांना त्यांचे सिडको फाईल नं.१०० अन्वये मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाचा भूखंड इरादीत करण्यात आलेले आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे | से. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| नावडे | ४५ | ५८ | २२०० चौ.मी. |

(सोयीकरिता वर वर्णन करण्यात आलेल्या भूखंडास यापुढे ''सदरहू भूखंड'' असे संबोधण्यात आलेले आहे.)

आमचे अशिलांनी सदरहू भूखंड श्री.केसरीनाथ भिवा पाटील, श्री.चंद्रकांत भिवा पाटील, कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस आणि कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू संपादीत मिळकत / सदरहू भूखंड किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाही व्यक्ती, संस्था किंवा कंपनी यांचा कोणाचाही साठेकार, विक्रीकरार, भाडेपट्टा, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, तारण, एम.ओ.यु., दावा, वादविवाद, कुळवहिवाट, चार्ज, ॲटॅचमेंट, वारसाहक्क व इतर कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास सदर व्यक्ती, संस्था अगर कंपनी वा त्यांचे हितसंबंधी यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी खालील सही करणार यांच्या कार्यालयात लेखी कळवावी. वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू संपादीत मिळकत / सदरहू भूखंड हे निर्वेध व बोजारहीत असून त्यामध्ये कोणाचाही हक्क-हितसंबंध नाही असे आमचे अशिल गृहीत धरुन सदरहू भूखंडाबाबतचा श्री.केसरीनाथ भिवा पाटील, श्री.चंद्रकांत भिवा पाटील, कै.प्रभाकर भिवा पाटील मयत तर्फे वारस आणि कै.लक्ष्मण भिवा पाटील मयत तर्फे वारस यांचे सोबतचा भूखंड हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करून सदरहू भूखंड हे आपल्या नावे कायमस्वरुपी त्रिपक्षीय कराराद्वारे सिडको दप्तरी हस्तांतरीत करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.
दि.२१/०५/२०२२

**सही-**
**ॲड.छाया रामदास म्हात्रे**
**(बी.ए., एल.एल.बी.)**
**पायोनिअर सोसायटी, ग्राऊंड फ्लोअर,**
**स्वामी नित्यानंद रोड, युविका हॉटेल**
**समोर, ता.पनवेल, जि.रायगड**

# संक्षिप्त...

## टाटा झेस्ट मोटार गाडीच्या गियर बॉक्स सह इंजिनच्या चेंबरची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील आजिवली हाय स्कूल जवळील एका गॅरेजमध्ये असलेल्या टाटा झेस्ट मोटारगाडीच्या गियर बॉक्स सह इंजिनच्या चेंबरची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

अबिद मोहम्मद असरुद्दिन शेख (वय २२) यांनी दिलेल्या तक्रारी नुसार दोन आरोपींनी संगनमताने अदिब शेख यांच्या गॅरेज मधील टाटा झेस्ट मोटारगाडीच्या गियर बॉक्स सह इंजिनच्या चेंबर असे मिळून एकूण २२ हजार रुपये किमतीचा मालमत्ता स्वतःच्या फायदा व लबाडी करीत चोरून नेल्याने या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अंकुश जाधव यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

महाराष्ट्र शिक्षक पॅनल च्या वतीने राज्यातील गुणवंत शिक्षकांना देण्यात येणारा राज्यस्तरीय सेवा सन्मान आदर्श शिक्षक पुरस्कार २०२२ हा पुरस्कार रोहा तालुक्यातील निवी गावातील शिक्षक अंकुश जाधव यांना प्रदान करण्यात आला. शामल अंकुश जाधव हे मोहन पाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्री सतीश मोहन पाटील यांच्या न्यू इंग्लिश स्कूल कळंबोली विद्यालयात गेली १८ वर्षे कार्यरत आहेत.पुणे भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह सिनेअभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड, शिक्षक आमदार विक्रम काळे साहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार स्वीकारताना त्यांच्या सौभाग्यवती सौ. अवंतिका जाधव ,मुले प्रथम – प्रथमेश व सासुबाई श्रीमती शालिनी खामकर त्यांच्या समवेत उपस्थित होत्या. अंकुश जाधव यांनी शामल मोहन पाटील एज्युकेशन सोसायटीच्या पनवेल तालुक्यातील कळंबोली येथील न्यू इंग्लिश स्कूल कळंबोली माध्यमिक शाळेत २००४ मध्ये आपल्या अध्यापन कार्याला सुरुवात केली. शैक्षणिक कार्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते प्रयत्नशील आहेत. अंकुश जाधव यांना ६० % शारीरिक अपंगत्व आहे. या अपंगत्वावर मात करीत त्यांनी शैक्षणिक ,सामाजिक, धार्मिक ,सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन सेवासन्मान राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२२ त्यांना देण्यात आला आहे.त्यांना प्राप्त झालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतना दिसत आहे,


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# विकासाचाच कडेलोट करण्यात माथेरानचे राजकारणी अग्रेसर ! स्थानिकांचे भवितव्य अंधकारमय ?

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दहा टक्के मतांसाठी नव्वद टक्के लोकांच्या भावना आणि स्वप्नांचा चुराडा करून केवळ मूठभर मतांसाठी केवळ सत्तेतून पैसा आणि पैशातून स्वतःचा विकास हे ध्येय काही राजकारणी मंडळींनी अवलंबिल्यामुळे माथेरान सारख्या अतिदुर्गम भागात शासनाच्या येणाऱ्या महत्वाकांक्षी योजना आणि नवनवीन प्रकल्पांना तिलांजली देण्यासाठी येथील काही महत्वाकांक्षी कुटुंबातील राजकीय मंडळींनी कंबर कसली आहे.



अशा हीन प्रवृत्तीच्या विकासाला खो घालणाऱ्या काही पक्षाच्या नेत्यांना स्वतःच्या अंगी कर्तृत्व नसताना देखील खोटे श्रेय घेण्यासाठी पुढाकार आणि स्वतःची पाठ थोपटण्यात धन्यता वाटत असल्याचे विदारक चित्र केवळ याच ठिकाणी आवर्जून पहावयास मिळत आहे.

जनतेला धावत्या युगाप्रमाणे वागणूक मिळणे, जगायला शिकणे आवश्यक असताना तुम्ही फक्त तुमचे पारंपरिक व्यवसाय करत राहा आम्ही तुमच्या मागे ठामपणे उभे आहोत. आम्ही अन्य विकासाची गंगा इथे येऊ देणार नाही. परंतु काहीही करून मते आम्हालाच मिळायला हवीत जेणेकरून नगरपरिषदेच्या सभागृहात जाऊन आमच्या कुटुंबातील सर्वच सदस्यांची स्वप्ने पूर्ण होतील याकडे काही राजकीय पक्षांच्या नेत्यांचा प्रामुख्याने कटाक्ष दिसून येत आहे. स्थानिक लोकांमध्ये व्यावसायिक दृष्ट्या काळानुसार बदल घडवून आणणे हे निवडून येणाऱ्या मंडळींचे कर्तव्य असताना अनेकांना आमिषे देऊन विकासाला विरोध करण्यात ही मंडळी खूपच पटाईत आहेत याचाच अनुभव व्यापारी वर्गासह स्थानिकांना आलेला आहे. आजवर याठिकाणी ठरावीक लोकांच्या बाळ हट्टापायी हे गाव विकासापासून खूपच पिछाडीवर पडलेले आहे. परंतु जर का एखाद्या पक्षाने अथवा अन्य कुणाच्याही माध्यमातून विकासाची गंगा या दुर्गम भागात येत असेल तर त्यास केवळ श्रेयापायी विरोध करण्यासाठी शर्यत सुरू असते. महत्वपूर्ण कामे आपल्या कार्यकाळात होत नाहीत त्यामुळे होणाऱ्या महत्वपूर्ण कामाला प्रकर्षाने विरोध करण्यासाठी नेते मंडळी अप्रत्यक्षपणे पुढाकार घेण्यात सिंहाचा वाटा उचलत असतात. कुठल्याही विकास कामांस काहींना आमिषे देऊन व्यत्यय आणण्यात इथल्या राजकीय पक्षांच्या नेत्यांचा हातखंडा आहे. त्यामुळे अशा विघ्नसंतोषी, नेतृत्वहीन मंडळींमुळेच हे गाव पर्यटन क्रांती करू शकलेले नाही.

माथेरान मधील राजकारणात जेमतेम पाच वर्षे सत्ता स्थापन करता येते परंतु सत्तेत विराजमान झाल्यावर अनेकांचे पाय जमिनीवर स्थिर रहात नाहीत त्यामुळेच दर पाच वर्षांनी नाईलाजाने अन्य पक्षाला सत्तेत स्थान मिळते ही वस्तुस्थिती आहे. सत्तेमुळे अंगवळणी पडलेल्या थाटामाटाची सवय जर हातातून निसटण्याची शक्यता वाटत असल्यास काही दहा टक्के लोकांना आमिषे देऊन वेळप्रसंगी चिथावून आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी पुरेपूर वापर केला जात आहे. अशा हीन प्रवृत्ती मुळे हे सुंदर स्थळ अन्य स्थळांच्या तुलनेत जगाच्या खूपच मागे जात आहे. तर काही अशिक्षित नागरिकांना ठाऊक नाही की हीच राजकीय मंडळी विकासाच्या कडेलोटा सोबत आपल्या स्वप्नांचा भावी पिढीच्या हक्काचा, ताठ मानेने जगण्याचा सुध्दा कडेलोट करीत आहेत. जोपर्यंत येथील ठराविक नागरिकांना मुलांच्या भविष्याची चिंता आणि भावी पिढीला धावत्या युगाप्रमाणे वागणूक देता येणार नाही तोपर्यंत वेळ निघून गेलेली असणार आहे. त्यावेळी स्वतः च्या पायावर कुऱ्हाड मारल्याचे दुःख नक्कीच त्यांना होऊन त्याच विकासास खोडा घालणाऱ्या राजकीय नेत्यांना ही गोरगरीब जनता नक्कीच लाखोल्या वाहणार आहे. असे भाकीत काही जाणकार ,सुज्ञ लोकांकडून ऐकावयास मिळत आहे.

## समर्पित आयोगाच्या भेटीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात मदत कक्ष स्थापन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

नागरिकांच्या मागास प्रवर्गास आरक्षण देण्यासंदर्भात नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी गठित समर्पित आयोग दि.२५ मे २०२२ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन येथे भेट देणार आहे. या भेटीदरम्यान नागरिक, संस्थांची मते जाणून घेणार असून निवेदने स्विकारण्यात येणार आहेत. यासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालय येथे मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती आणि शहरातील महानगरपालिका, नगर पालिका आणि नगरपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास (ओबीसी, व्हीजे एनटी) आरक्षण देण्यासठी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने समर्पित आयोग गठीत केला आहे. त्यानुसार राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गातील आरक्षणासाठी जनतेची मते जाणून घेण्यासाठी आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संघटना यांची निवेदने स्वीकारण्यासाठी हा समर्पित आयोग विभागनिहाय भेटी देणार आहे.

हा आयोग कोकण भवन येथील कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात दुपारी ०२.३० ते ०४.३० या वेळेत भेट देणार आहे. यावेळी नागरिकांना वेळेत निवेदन देता यावेत यासाठी भेटीच्या दिनांकापूर्वी कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात नाव नोंदणी करावी, असे आवाहन आयोगातर्फे करण्यात आले आहे. तसेच यासंदर्भात रायगड जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर मदत कक्ष स्थापन करण्यात आला असून सामान्य शाखेतील लिपीक स्वप्नील कदम (मो. क्र.८२३७१६८७८९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## मुरूडच्या समुद्र किनारी मृत दुर्मिळ ४५ की. वजनाचे लॉगहेड समुद्री कासव

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड समुद्र किनारी आज सकाळी मृत महाकाय कासव आढळून आले. हे कासव दुर्मिळ लॉगहेड प्रजातीतील असुन याची लांबी सुमारे ३.५ फुट आहे तर या कासवाचे वजन ४५ कीलो होते. सदर कासव ८ दिवसांपूर्वी मृत झाले असावे असे सर्पमित्र संदीप घरत यांनी सांगितले. हे कासव खुप कुजलेले असल्याने यांच्या मृत्यूचे कारण समजू शकले नाही.



आज सकाळी नेहमीप्रमाणे मुरुड समुद्र किनारी विनोद अंबुकर घोडा गाडी चालक व्यवसाय करण्यासाठी गेले होते. त्यावेळी समुद्रकिनारी पाण्यात हे कासव वाहून आलेले दिसले. सदर कासव कासव खुप कुजलेले असल्याने दुर्गंधी येत होती. त्यावेळी सर्प मित्र संदिप घरत यांना हि वार्ता कळविण्यात आली. संदिप घरत यांनी तातडीने वनखात्याला बोलावून या कासवाला वनखात्याने समुद्र किनारी पुरून टाकले.

गेल्याच महिन्यात १० एप्रिल रोजी याच ठिकाणी ३० ते ३५ किलो वजनाचे याच जातीचे कासव मृत अवस्थेत आढळून आले होते. त्या नंतर याच महिन्यात २ मे रोजी खोरा बंदरात लॉगहेड जातील मादी कासव जिवंत स्वरुपात आढळून आले होते. आणि आज पुन्हा मृत कासव आढळल्याने प्राणी मित्रांकडून हळहळ व्यक्त होत आहे.

सदर या कासवांच्या मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली असून वनखात्याने या समुद्री कासवांच्या संवर्धनासाठी प्रयत्न केला पाहिजे जेणेकरून या कासवांच्या मृत्यूच्या प्रमाणात वाढ होणार नाही. असे मत सर्पमित्र संदीप घरत यांनी बोलताना व्यक्त केले.

# वरवठणे येथील श्री हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धार सोहळ्याचे २१ ते २३ मे ला आयोजन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील वरवठणे गावातील श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व प्राण प्रतिष्ठाण सोहळा शनिवार दि. २१ ते सोमवार दि. २३ मे रोजी संपन्न होत असुन या धार्मिक सोहळ्यास रायगडचे खासदार सुनील तटकरे, आमदार रविशेठ पाटील, आमदार अनिकेतभाई तटकरे, माजी आमदार धैर्यशीलदादा पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

नागोठणे पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी या धार्मिक सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमांची शोभा वाढवावी असे आवाहन जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष पांडुरंग मारुती म्हात्रे यांच्यासह जीर्णोद्धार समितीचे पदाधिकारी, सल्लागार व सदस्यांनी केले आहे.

शनिवारी सकाळी ७ वाजता देवी देवतांचे मानपान, सकाळी ८ वाजता आवाहित देवता पूजन प्रारंभ, गणेश पूजन, दुपारी १२ वाजता होम हवन प्रारंभ, सायंकाळी ५ वाजता मूर्तीची मिरवणूक, रात्री ८ ते १० महाप्रसाद, रात्री १० वाजता जागर भजन व लहान मुलांचे विविध गुणदर्शन, रविवारी सकाळी ७ वाजता आवाहित देवता पूजन व हनुमान मूर्ती कळश अभिषेक, सकाळी ११ वाजता मूर्तीस प्राण प्रतिष्ठापणा व कलशारोहन, दुपारी १२ वाजता तीर्थप्रसाद, सायंकाळी ६ वाजता हरिपाठ व प्रवचन, रात्री १० वाजता जागर – भजन, सोमवारी सकाळी ७ ते दुपारी १२ वाजेपर्यंत श्री हनुमान जप, दुपारी २ ते ४ वाजता श्री सत्यनारायण महापूजा, दुपारी ४ ते ६ वाजता मान्यवर मंडळी व देणगी दात्यांचा सत्कार समारंभ, सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजता हरिपाठ, रात्री ८ ते १० वाजता महाप्रसाद व रात्री १० ते १२ वाजता कीर्तन सोहळा असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती जीर्णोद्धार समिती कडून देण्यात आली आहे.

# महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाची कोकण विभागीय आढावा बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत कोकण विभागात सन २०२१–२२ मध्ये ऑनलाईन पध्दतीने १ लाख ७९ हजार ५९१ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १ लाख ४१ हजार २८५ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. निकाली काढलेल्या अर्जांपैकी १ लाख ३४ हजार ०५१ अर्ज विहित मुदतीत सेवा देऊन निकाली काढण्यात आले आहेत. या अधिनियमांतर्गत सर्वाधिक अपिल ठाणे जिल्ह्यात दाखल झाले असून, कोकण विभागात अव्वल कामगिरी झाली आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त दिलीप शिंदे यांनी दिली.

कोकण भवनात महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत कोकण विभागाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, अभय यावलकर, उप आयुक्त (प्रशासन) मनोज रानडे यांच्यासह कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिनिधी उपस्थित होते.

पारदर्शकता, उत्तरदायित्व, कालबध्द सेवा, कार्यक्षमसेवा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर व ई–प्रशासनाचा अवलंब ही महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याची मुख्य उद्दीष्टे आहेत. या कायद्यांतर्गत ५०६ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. ज्या नागरिकांना आरटीएस महाराष्ट्र मोबाईल प किंवा आपले सरकार आरटीएस पोर्टलचा वापर करणे शक्य नाही, अशा नागरीकांसाठी कोकण विभागात एकूण ३ हजार २३८ आपले सरकार सेवा केंद्र व ४२ आपले सरकार सेतु सेवा केंद्र कार्यरत आहेत. शहरी भागात १ हजार ६४८ व ग्रामीण भागातील ग्रामपंचायत स्तरावर १ हजार ५४८ आपले सरकार सेवा केंद्रे कार्यरत आहेत.

सर्व विभागांमध्ये जिल्हाधिकारी यांना नियंत्रक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले असून यासंबंधिचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

यावेळी उपस्थितांना सादररीकरणाव्दारे माहिती देण्यात आली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींची चर्चा करण्यात आली. श्री. शिंदे यांनी अधिकाऱ्यांव्दारे विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

## जग सुधारण्याचे कार्य संतांनी केले : ह.भ.प. भरत महाराज जोगी

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

जग भरपूर पुढे गेला आहे कि आता पायात बुटे घालून जेवायला लागला आहे आता पन्नास टक्के सुधारला आहे.दहा वर्षानंतर हे बुटात भात घेऊन खातील म्हणजे शंभर टक्के सुधारले.कपडे सुधारले कडक इस्त्रीचे कपडे हजार लफडे, बोली भाषा सुधारली आपले दुर्भाग्य आहे. भगवंतांचे एवढे उपकार आहेत हा देह त्यांनी बनविला व संतांनी भगवंताची ओळख करुन दिली म्हणून जग सुधारण्याचे कार्य संतांनी केले असे प्रतिपादन ह.भ.प.भरत महाराज जोगी बीड,परळी वैजिनाथ यांनी आतां तुम्ही कृपावंत श्र साधूसंत जिवलग श्रश्र१श्रश्र गोमटे ते करा माझे श्र भार ओझे तुम्हासी श्रश्र२श्रश्र वंचिले पाया–पाशी श्र नाही याशी वेगळे श्रश्र३श्रश्र तुका म्हणे सोडविल्या गाठी दिली मिढी पायासी श्रश्र ४श्रश्र या जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या अभंगाच्या आधारे स्पष्ट केले.

म्हणून ज्ञानदेवा सारखा संत नाही, ज्ञानेश्वरी सारखा ग्रंथ नाही, वारकरी संप्रदाया सारखा पंथ नाही.बाकी आले तसे गेले हा मात्र अनाधिकाळापासून जशाच तसे आहे यावेळी ह.भ.प. मारुती महाराज कोल्हाटकर,गायनाचार्य रविंद्र मरवडे, वैभव खांडेकर, मृदूंगमणी ज्ञानोबा महाराज दळवी, नंदू महाराज तेलंगे,अक्षय ओव्हाळ, सुनिल भऊर, हरिचंद्र धामणसे,पांडुरंग दळवी, गंगाराम दळवी, किरण ठाकूर, गणेश दिघे, राजा म्हसकर व कोलाड परिसरातील असंख्य वारकरी उपस्थित होते.

या अगोदर भैरी भवानी बापदेव जीर्णोद्धार सोहळ्यानिमित्ताने सोमवार दि.१६ मे रोजी श्रींची मिरवणूक, मंगळवार दि.१७ मे रोजी गणपती पूजन, पुण्याहवाचन,अभिषेक,होम हवन, देवाला धान्यधिवास, कळस पूजन, बुधवार दि.१८ मे रोजी होम हवन, देव स्थापना, कळसरोहन सोहळा, महापूजा,किल्ला व कोलाड विभागीय वारकरी संप्रदाय यांचा हरिपाठ कार्यक्रम आयोजित करण्यात आला यावेळी आ.अनिकेत तटकरे,व कोलाड परिसरातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

सर्व कार्यक्रम यशस्विकरण्यासाठी संजय मांडळुस्कर,अनंत सानप,चंद्रकांत फाटे, हरिचंद्र कदम, सुनिल दळवी,अशोक धामणसे,मधुकर दिसले, विठ्ठल पवार, राजु लहाने, दत्ताराम जोशी, विठोबा सानप, सुधाकर दिसले चंद्रकांत लहाने,डॉ, सागर सानप, डॉ. सुजित दिसले, सचिन दिसले,उमाजी आंब्रुस्कर,समिर पडवळ,बबन दळवी, अजित लहाने, दिनकर सानप, ज्ञानेश्वर दळवी समस्थ ग्रामस्थ मंडळ, तरुण वर्ग महिला मंडळ यांनी मेहनत घेतली.

## चारित्र्यावर संशय घेऊन मानसिक त्रास दिल्याने महिलेने गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बाहेरच्या लोकांशी का बोलतेस असे बोलून चारित्र्यावरती संशय घेऊन आणि पैशाची मागणी करून मानसिक त्रास दिल्याने या त्रासाला कंटाळून एका महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना तळोजा परिसरात घडली आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तिघानाही अटक केली असल्याची माहिती वपोनि जितेंद्र सोनावणे यानी दिली.

शालन यांचे लग्न २०१९ मध्ये प्रल्हाद माणिक वाकळे (परभणी) यांच्यासोबत झाले. २०२१ मध्ये पती प्रल्हाद, सासू विमल, सासरे माणिक यांनी माहेरून ५० हजार रूपये आणण्यासाठी तिच्याकडे तगादा लावला. यावेळी तिने पैसे नसल्याचे सांगितले. त्यानंतर तिला मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. काही महिन्यांनी शालन ही तिच्या कुटुंबासह कामाकरता बी जी शिर्के कंपनी, तळोजा येथे आली होती व तेथेच राहत होती. यावेळी तिच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागले. तसेच पुन्हा ५० हजार रुपये माहेरून घेऊन ये यासाठी त्रास देण्यात येऊ लागला. याबाबतची माहिती शालन हिने तिच्या माहेरच्याना दिली.

यावेळी माहेरच्यांनी तिला समजावले. त्यानंतर १७ मे रोजी प्रल्हाद यांनी सासरे सोपान निकाळजे यांना फोन करून मुलगी शालन मयत झाली असल्याचे सांगितले. यावेळी शालनने गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्या केल्याप्रकरणी शालन यांचे पती प्रल्हाद वाकळे, सासु विमल वाकळे आणि सासरे माणिक वाकळे यांच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत. शालन याना गलफास दिला आसल्याचा आरोप नातेवाइक करत आहेत.

## रायगड जिल्हा नाभिक समाज सभागृह जीर्णोद्धार ; समितीची सोमवारी बैठक

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रायगड जिल्हा नाभिक समाज सभागृह जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष भाई टके यांचच्या सूचनेनुसार जिल्हा नाभिक समाज सभागृह बांधकामाचे हिशोब करण्यासाठी रायगड जिल्हा नाभिक समाज सभागृह जीर्णोद्धार समितीची बैठक

सोमवार दिनांक २० मे रोजी सकाळी दहा वाजता आंबेवाडी–पाले (कोलाड) येथील रायगड जिल्हा नाभिक समाजाच्या पांडुरंग रामजी सपकाळ सभागृहात आयोजित केली आहे. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व समाज बांधव व भगिनी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जीर्णोद्धार समितीचे सचिव शैलेश रावकर यांनी केले आहे.

रायगड जिल्हा जीर्णोद्धार समितीची बैठक समितीचे अध्यक्ष भाई टके यांचे अध्यक्षतेखाली होणार असुन या सभेत रायगड जिल्हा नाभिक समाज सभागृह बांधकामाचा हिशोब देणे तसेच आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. जर या सभेस गणसंख्येच्या अभावी तहकुब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल अशी माहितीही शैलेश रावकर यांनी दिली आहे.

## उरण शहरात मुख्याधिकाऱ्यांच्या हस्ते गॅस शवदाहिनीचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहराच्या हद्दीत उरण नगरपरिषदेच्या पुढाकाराने बोरी स्मशान भूमी येथे उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या हस्ते काल गॅस शवदाहिनीचे भूमिपूजन करण्यात आले.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोस्थान महा अभियान जिल्हा स्तर या योजनेकडे उरण नगरपरिषदने पाठपुरावा केला होता.त्याला यश आले असून सदर योजने कडून कामा साठी सुमारे ९४ लाख ७९ हजार १८२ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.या रकमेतून गॅस शवदाहिनी आस्थापित करणे, शव दाहिनी हॉल व शेडचे काम करण्यात येणार आहे.



सदर काम मेसर्स चिरंतन उद्योग, नौपाडा ठाणे यांना देण्यात आले असून कार्यादेश दिल्या पासून १५० दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे. अशी माहिती उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी दिलीआहे. उरण नगरपरिषदेच्या पुढाकाराने उरण नगरपरिषद हद्दीत गॅस शवदाहिनी होत असल्याने या पर्यावरण पूरक उपक्रमामुळे नागरिकांत समाधान व्यक्त होत असून नगरपरिषद प्रशासनाचे कौतुक होत आहे. या प्रसंगी, उरण नगरपरिषद अभियंता झुंबर माने, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, मेसर्स चिरंतन उद्योग चे विशाल केणी, उरण नगरपरिषदेचे कर्मचारी व नागरिक आदी उपस्थित होते.